|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon



## प्रवेश व पात्रता विभाग

जा.क्र.कबचौउमवि/प्रपा/ ई-सुविधा फी/३६८ /२०२६ दि.१०.०६.२०२६

**परिपत्रक क्र. ०९ / २०२६**

**प्रति,**
**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी**
**संलग्नीत सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालये यांचे प्राचार्य**
**व मान्यता प्राप्त परिसंस्था यांचे संचालक आणि विद्यापीठातील**
**शैक्षणिक प्रशाळा / विभाग यांचे मा.संचालक विभागप्रमुख यांना..**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विद्यार्थी विमा शुल्क प्रति विद्यार्थी रु.४०/- इतकी रक्कम विद्यापीठाकडे जमा करणेबाबत..

**महोदय / महोदया,**

आपणास विदिच आहे की, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामार्फत प्रतिवर्षी विद्यार्थ्यांचा विद्यार्थी सामुहीक सुरक्षा अपघात मृत्यू विमा योजना राबविण्यात येत असते. या योजनेत प्रति विद्यार्थी विमा दराप्रमाणे विमा कंपनीस रक्कम अदा केली जाते व नियमित प्रवेशित विद्यार्थ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याचा वारसास विमा कंपनीकडून रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र ) देण्यात येत असतात.यापुर्वी नियमित प्रवेशित विद्यार्थ्यांकडून विमा शुल्क प्रति विद्यार्थी रु. २०/- प्रमाणे घेण्यात येत असते.परंतू सद्याच्या विमा कंपन्यांच्या प्रचलित दरानुसार प्रति विद्यार्थी रु. ३८/- पर्यत रक्कम दिली जात आहे.त्यामुळे अतिरीक्त रक्कम विद्यापीठ फंडातून अदा करावी लागत होती.मात्र विमा कंपनीच्या प्रति विद्यार्थी दरांचा विचार करता शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विद्यार्थी विमा शुल्क प्रति विद्यार्थी रु.४०/- इतकी रक्कम महाविद्यालयांकडून घ्यावी असता असा प्रस्ताव संबंधीत विभागाकडून प्राप्त झाल्यावर मा.अधिष्ठाता मंडळ आणि मा.शुल्क निश्चिती समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आला असता, समितीने केलेल्या शिफारशींना मा.विद्या परिषद सभेत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

तेव्हा, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून विद्यार्थी विमा शुल्क प्रति विद्यार्थी रु.४०/- इतकी रक्कम विद्यापीठाकडे जमा करावी आणि सदरची बाब महाविद्यालयांतील तसेच प्रशाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी तसेच संबंधीत कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.विनोद प्र.पाटील
( **कुलसचिव** )

**प्रत माहितीसाठी :**
१.मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगांव.
२.मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगांव.
३.मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगांव.
४.मा.संचालक, विद्यार्थी विकास विभाग, कबचौउमवि, जळगांव.
५.मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव.
६.समन्वयक ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि, जळगांव.